# डिजिटल जगाच्या दिशेने सुरक्षित प्रवास



पुणे : ''योग दिनानिमित्त ❋सायबर वारी❋ असा उपक्रम /कार्यक्रम अण्णासाहेब मगर महाविद्यालयातर्फे सायबर सुरक्षततेच्या जनजागृती साठी''आज अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर, पुणे येथे योग दिनानिमित्त सायबर सुरक्षेबर जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या उपक्रमांतर्गत, महाविद्यालयाच्या सायबर सुरक्षा टीमने पाच वेगवेगळ्या ठिकाणी सायबर सुरक्षेबद्दल माहिती दिली. इंद्रप्रस्थ सोसायटी, हडपसर,पुणे , येथे समन्वय प्राध्यापक डॉ. गांधीले, डॉ.सकपाळ, प्रो. अनिल जगताप व अवधूत मोरे ,पी. डी. तरवडे गॅरेज भारत फोर्ज रोड, पुणे , डॉ. शुभांगी औटी, प्रो. सविता भुजबळ,प्रो. मनिषा गाडेकर, प्रो. ऋषिकेश मोरे व डॉ. गणेश आवटे, श्री संत शिरोमणी गोरोबाकाका मंदिर केशवनगर, मुंढवा, पुणे , येथे समन्वयक प्राध्यापक प्रो. जयश्री अकोलकर, प्रो.अविनाश राठोड , प्रो. अपूर्वा बनकर व तेजस दळवी, वर्धमान इंग्लिश मिडीयम स्कूल, हडपसर, पुणे , येथे प्रो. ओव्हल, प्रो. अवधूत करडीले , डॉ. प्रशांत मुळे व यश भराटे आणि अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर, पुणे या ठिकाणी डॉ.निकमसर , डॉ. सविता कुलकर्णी, डॉ. जोशी रमाकांत, प्रो. सुनील वाघमोडे, डॉ. निंबाळकर व अश्लेशा दामगुडे या सर्वांनी उत्तमरित्या सायबर वारी घडवून आणली.

या उपक्रमात, विद्यार्थ्यांना तसेच वारकरी संप्रदायातील लोकांना व अशिक्षित किंवा कमी शिक्षण असलेल्या लोकांना जागरूक करण्याचा एक छोटासा प्रयत्न करून ऑनलाइन धोके, फिशिंग अटॅक्स, आणि सुरक्षित पासवर्ड व्यवस्थापनांसारख्या विषयांवर मार्गदर्शन करन्यात आले. विद्यार्थ्यांनी व आपल्या समाजातील लोकांनी/वारकऱ्यांनी या मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आणि त्यांच्या सुरक्षेबद्दलची जाणीव वाढवली. या कार्यक्रमात शांतपणे पण निष्ठेने साथ दिलेल्या , विशेषत: आपल्या सर्व शिक्षक आणि शिक्षियेतर विशेष आभार श्री. चंद्रकांत साठे,श्री.नाना शिंदे ,श्री. राखुंडे ,श्री. एस. पी. पवार , श्री.गुरव यांचे मन:पूर्वक आभार. अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्या सायबर सुरक्षा टीमचे हे कार्य अत्यंत प्रशंसनीय आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये, सर्व लोकांनमध्ये सायबर सुरक्षेची जाणीव वाढते. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. प्रशांत मुळे, डॉ शुभांगी औटी, प्रो. अनिल जगताप आणि प्रो. जयश्री अकोलकर यांच्या सर्वांच्या अध्यक्षतेखाली व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नितीन घोरपडे मार्गदर्शनाने कार्यक्रम उत्तमरित्या पार पडला.